आर. आर. साखरे, जामखेड.

□ नरगीस दत्तने बालकलाकार म्हणून एखाद्या चित्रपटात भूमिका केली आहे का? असेल तर त्या चित्रपटाचे दिग्दर्शक कोण? नायक-नायिका कोण?

– नरगीसने बेबी राणी या नावाने *तलाश-ए-हक*(दिग्दर्शक सी. एम. लुहेर, नायक-नायिका याकूब-जद्दनबाई), *मोती का हार*(दिग्दर्शिका जद्दनबाई, नायक-नायिकाः आशिक हुसेन-जद्दनबाई), मॅडम फॅशन(दिग्दर्शिका जद्दनबाई, नायक-नायिकाः आशिक हुसेन-जद्दनबाई), तमन्ना(दिग्दर्शक फणी मजूमदार, नायक-नायिकाः जयराज-लीला देसाई) या चित्रपटात बालतारकेची भूमिका केली होती. या चित्रपटांपैकी *तमन्ना* सोडून अन्य चित्रपटांत नायिकेची भूमिका करणारी जद्दनबाई नरगीसची आई.

स्वरूप खोपडे, पुणे.

□ मराठीतला व हिंदीतला पहिला विनोदी चित्रपट कोणता?

– १९३५चा *सत्याचे प्रयोग* व *ठकीचं लग्न* हा विश्राम बेडेकरनी दिग्दर्शित केलेला जोड चित्रपट म्हणजे मध्यंतरापर्यंत एक चित्रपट व मध्यंतरानंतर दुसरा चित्रपट- हा मराठीतला पहिला विनोदी चित्रपट. १९३२चा रणजीत मुव्हीटोनचा जयंत देसाई दिग्दर्शित *चार चक्रम* हा चित्रपट हिंदीतला पहिला विनोदी चित्रपट.

□ मिथुन चक्रवर्तीला आतापर्यंत कोणकोणते पुरस्कार मिळालेत?

– *मृगया*, *तहादेर कथा*साठी मिथुनला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. *मृगया* हिंदी होता. *तहादेर कथा* बंगाली, *अग्निपथ*, *जल्लाद*साठी त्याला फिल्मफेअर पुरस्कार मिळालाय. *अग्निपथ*चा त्याचा पुरस्कार सहाय्यक अभिनेत्याचा होता आणि *जल्लाद*चा पुरस्कार खलनायकाचा.

विश्वजीत सास्ते, खडकी.

□ दुर्गा खोटेंनी कधी खलनायिकेची भूमिका केलीय का?

– आपल्या चित्रपटात पहिली कजाग सासू दुर्गा खोटेंनीच सर्वात प्रथम आणली. आचार्य अत्रे यांच्या *पायाची दासी* या चित्रपटात *भरतभेट* तथा *भरत मिलाप* या मराठी-हिंदी चित्रपटात त्या कैकयी बनल्या होत्या.

पूजा गोडबोले, फणसवाडी.

□ *नवरी मिळे नवऱ्याला* या चित्रपटाचे दिग्दर्शक कोण? नायिका कोण?

– *नवरी मिळे नवऱ्याला*चा दिग्दर्शक-नायक होता सचिन, नायिका सुप्रिया सबनीस. या चित्रपटाच्या वेळी सचिनला नवरी मिळाली. या चित्रपटाची नायिका पुढे सचिनशी करून सुप्रिया पिळगावकर बनली.

दुर्गेश सावंत, गुहागर.

□ रिमाचे मराठी चित्रपट कोणते?

– *तू सुखी रहा*, *श्रीमंत मेहुणा पाहिजे* या चित्रपटात रिमा बालतारका होती. *सिंहासन*, *जावयाची जात*, *अरे संसार संसार*, *जय तुळजा भवानी*, *नणंद भावजय*, *माझं घर माझा संसार* यासारख्या काही मराठी चित्रपटात तिने भूमिका केल्या.

नरेश कोळी, रायगड.

□ बॉर्डरवर बनवण्यात आलेले चित्रपट कोणकोणते?



सरफरोशमध्ये नसीरुद्दीन शाह-आमीर खान

– *हकीकत*, *पहला आदमी*, *गुलामी*, *बॉर्डर*, *सरफरोश*.

संदीप खोपडे, धनकवडी, पुणे.

□ स्मिता पाटीलने भूमिका केलेले मराठी आणि हिंदी चित्रपट कोणते?

– मराठी चित्रपटः *राजा शिवछत्रपती*, *सामना*, *जैत रे जैत*, *सर्वसाक्षी*, *उंबरठा*.

हिंदी चित्रपटः *चरणदास चोर*, *निशांत*, *गमन*, *मंथन*, *चक्र*, *तर्जुबा*, *शेर शिवाजी*, *अल्बर्ट पिंटो को घुस्सा क्यूं आता है*, *सद्‌गति*, *नमक हलाल*, *भीगी पलके*, *बदले की आग*, *दिले नादान*, *अंधेर नगरी*, *घुंगरू*, *मंडी*, *कयामत*, *अर्धसत्य*, *चटपटी*, *सुबह*, *हादसा*, *फरिस्ता*, *आनंद और आनंद*, *रावण*, *आज की आवाज*, *कसम पैदा करनेवाली की*, *पेट प्यार और पाप*, *शपथ*, *कानून मुठ्ठी में*, *मेरा दोस्त मेरा दुश्मन*, *तरंग*, *अर्थ*, *दर्द का रिश्ता*, *अमृत*, *गुलामी*, *दिलवाला*, *अंगारे*, *हम दो हमारे दो*, *काच की दीवार*, *जबाब*, *अनोखा रिश्ता*, *आप के साथ*, *दहलिज*, *मिर्च मसाला*, *आखिर क्यूं?*, *हम फरिस्ते नही*, *नजराना*, *गिद्ध*, *राही*, *सूत्रधार*, *तिसरा किनारा*, *डान्स डान्स*, *देवा शिशू*, *आकर्षण*, *वारिस*, *आग*, *मेरे साथ चल*, *उचनीचबीच*, *सितम*.

पी.एस. म्हापसेकर, गोवा.

□ फिल्मनगरच्या संन्यासी या चित्रपटातील संगीतकार शंकर-जयकिशन यांनी *संन्यासी*नंतर त्यांच्या आणखी एखाद्या चित्रपटाला संगीत दिले होते का? सोहनलालना किती फिल्मफेअर पुरस्कार मिळाले?

– *संन्यासी*नंतर शंकर-जयकिशननी सोहनलाल कंवर यांच्या *दुनियादारी*, *नारी*, *पापी पेट का सवाल* या चित्रपटांना आणि *संन्यासी*च्या आधी *बेईमान*, *दो झूठ*, *सीमा*, *पहचान* या चित्रपटाला १९७२ला सर्वश्रेष्ठ चित्रपटाचे फिल्मफेअर पारितोषिक मिळाले होते.

□ शंकर-जयकिशनने संगीत दिलेल्या *गंगा और सीता* या चित्रपटातील प्रमुख कलाकार कोण?

– या नावाचा चित्रपट निघालेलाच नाही.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ रमेश देवने हिंदी चित्रपटात खलनायकाची भूमिका केलीय का?

– *जैसे को तैसा*, *सरस्वतीचंद्र* यासारख्या काही हिंदी चित्रपटात रमेश देवने खलनायकाची भूमिका केलीय.

आर. ए. शेटे, पुणे.

□ प्राण यांचा पहिला चित्रपट कोणता? दिग्दर्शक व संगीतकार कोण?

– *यमलाजट* हा पंजाबी चित्रपट प्राणचा पहिला चित्रपट. हिंदीतला त्याचा पहिला चित्रपट १९४२चा *खानदान*. दिग्दर्शक शौकत हुसेन. संगीतकार गुलाम हैदर.

संतोष हालकुडे, कुर्डूवाडी.

□ प्राणला कोणत्या चित्रपटांसाठी पुरस्कार मिळाले आहेत?

– *उपकार*, *आसू बन गये फूल*, *बेईमान* या चित्रपटांसाठी प्राणला फिल्मफेअर पुरस्कार मिळाले आहेत.